विकसित महाराष्ट्र - २०४७ उपक्रमांतर्गत "ॲग्री-टेक सुकाणू समिती" (Agri-Tech Steering Committee) गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : एआय-२०२६/प्र.क्र.२२८/१३-अे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ७ ऑगस्ट २०२६

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या 'विकसित भारत-२०४७' या ध्येयाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था समृद्ध करणे व कृषि क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर गतिमान करण्यासाठी 'विकसित महाराष्ट्र-२०४७' चा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

सदर कृती आराखड्यातील अ.क्र. १ नुसार राज्यामधील ॲग्री-टेक उपक्रम, डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI), डेटा शेअरिंग, एआय आणि इतर तंत्रज्ञानाधारित प्रकल्पांची सुलभ व प्रभावी अंमलबजावणी करणे, विभागांमध्ये समन्वय साधणे आणि या सर्व उपक्रमांचा नियमित आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय "ॲग्री-टेक सुकाणू समिती" (Agri-Tech Steering Committee) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

विकसित महाराष्ट्र-२०४७ अंतर्गत ॲग्री-टेक आणि तंत्रज्ञानाधारित कृषि उपक्रमांच्या अंमलबजावणीचा व प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे "ॲग्री-टेक सुकाणू समिती" (Agri-Tech Steering Committee) गठीत करण्यात येत आहे:

अ.क्र.	सदस्य / पदनाम	समितीतील पद
१	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२	आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
३	सह/उप सचिव (ई.मा.तंत्र.कृ.बु.), इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (EITAI) विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
४	सह/उप सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
५	सह/उप सचिव (सहकार), सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
६	सह/उप सचिव (पणन), सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य

७	प्रतिनिधी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC)	सदस्य
८	प्रतिनिधी/संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला	सदस्य
९	प्रतिनिधी/संशोधन संचालक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी	सदस्य
१०	प्रतिनिधी/संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी	सदस्य
११	प्रतिनिधी/संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली	सदस्य
१२	व्यवस्थापकीय संचालक, कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्री-टेक नाविन्यता केंद्र (AIAIC)	सदस्य
१३	सह /उप सचिव (१३-अे), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य सचिव

२. समितीची कार्यकक्षा -

- ॲग्री-टेक धोरण व मार्गदर्शक तत्त्वे तयार करून राज्यातील कृषि क्षेत्रासाठी आवश्यक डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI), डेटा शेअरिंग प्लॅटफॉर्म्स, AI व इमर्जिंग टेक्नॉलॉजीजच्या (IoT, Robotics, GIS) वापराबाबत धोरणात्मक निर्णय व मार्गदर्शन करणे.
- मासिक आढावा समितीची दरमहा किमान एक बैठक पार पडेल, ज्यामध्ये ॲग्री-टेक प्रकल्पांच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला जाईल.
- कृषि विभाग, IT, सहकार, वित्त, NIC आणि कृषि विद्यापीठे यांच्यात समन्वय साधणे.
- ॲग्री-टेक इनोव्हेशन सेंटर्स, पायलट प्रोजेक्ट्स, सँडबॉक्स प्रयोग आणि एआय-आधारित उपायांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे.

३. वरील विवरणपत्रामध्ये संबंधित मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिका-यांचे नामनिर्देशन करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०७१४३५४४११४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.08.07 14:36:58 +05'30'

(डॉ. ललितकुमार रं. धायगुडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव

३. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग,
४. अ.मु.स./प्र.स./सचिव, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई.
५. अ.मु.स./प्र.स./सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अ.मु.स./प्र.स./सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (EITAI) विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
९. प्रकल्प संचालक, मा. बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, पुणे.
१०.व्यवस्थापकीय संचालक, कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्री-टेक नाविन्यता केंद्र (AIAIC), मुंबई
११.अ.मु.स./प्र.स./सचिव, सहकार व पणन विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१२.अ.मु.स./प्र.स./सचिव, वित्त विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१३.अ.मु.स./प्र.स./सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (EITAI) विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१४.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
१५.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.
१६.महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद (MCAER)
१७.कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
१८.कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
१९.कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२०.कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२१.संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय.
२२.उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.अवर सचिव /कक्ष अधिकारी, सर्व कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२४.निवड नस्ती (का. १३ अे)